01/12/2021

# जीएसटी सेट ऑफ साठीचे छाननी पॅरामीटर्स

एडवोकेट किशोर लुल्ला

वस्तू आणि सेवा कायद्याअंतर्गत जीएसटीआर-१, जीएसटीआर-३बी, जीएसटीआर-९ ही विवरणपत्रके भरल्यानंतर शासनाकडून या सगळ्यांची कलम ६१, नियम ९९ अन्वये एएसएमटी १० मध्ये छाननी केली जाते. जर त्यामध्ये फरक असेल तर त्याचा खुलासा मागण्यासाठी व्यापाऱ्यास पत्र अगर नोटीस काढली जाते. त्याचा खुलासा व्यापाऱ्याने एएसएमटी ११ मध्ये देणेचा असून जर तो खुलासा मान्य झाल्यास सक्षम अधिकाऱ्याने एएसएमटी १२ मध्ये पत्र देवुन चौकशी थांबवायची आहे. जर समाधानकारक खुलासा दिला नाही किंवा दिलेल्या खुलासा मान्य झाला नाही तर सक्षम अधिकारी नोटिस दिल्या पासून तीस दिवसात कलम ६५,६६,६७ खाली कार्यवाही सुरू करू शकतो किंवा कलम ७३,७४ खाली करदेयता ठरविण्याची कार्यवाही सुरू करू शकतो. कोणत्या मुद्द्यांवर छाननी केली जाते यासाठी शासनाने १५ पॅरामीटर्स जाहीर केले आहेत. सदर पॅरामीटर्स काय आहेत, त्या बाबतीतील तपशील आणि काही खुलासे या लेखामध्ये देत आहे.

**अ) इनपुट टॅक्स क्रेडिटवर आधारित छाननी पॅरामीटर्स-**

**१) पॅरामिटर ००६९--** ज्या पुरवठादाराचा जीएसटी नोंदणी क्रमांक मुळापासूनच रद्द केला आहे अशा व्यापाऱ्याकडून केलेल्या वस्तू आणि सेवेच्या खरेदीवर मागणी केलेले इनपुट टॅक्स क्रेडिट--- कलम २९(२) आणि नियम २१ प्रमाणे, शासनाला काही व्यापाऱ्यांच्या बाबतीत विशिष्ट परिस्थितीत त्यांचा नोंदणी दाखला मागील तारखेपासून देखील रद्द करण्याचा अधिकार आहे. यामध्ये मुख्यतः बोगस नोंदणी दाखल्यांचा समावेश होतो. अशावेळी नोटीस आल्यावर सर्वप्रथम जीएसटीएन पोर्टलवर जाऊन अशा नोंदणी दाखल्याचा तपशील जाणून घ्यावा आणि त्यानंतर योग्य ते उत्तर द्यावे. वास्तविक सीएसटीच्या कलम १६(२) प्रमाणे जर खरेदीदाराकडे खरेदीचे बिल आलेले असेल तसेच माल देखील आलेला असेल तर त्याला इनपुट टॅक्स क्रेडिट क्लेम करण्याचा अधिकार आहे. विक्रेत्याचा नोंदणी दाखला मागील तारखेपासून रद्द केल्यामुळे खरेदीदाराचा हक्क डावलता येणार नाही.

**२) पॅरामिटर ००७२--** पुरवठादाराने जीएसटीआर ३बी न भरल्यामुळे खरेदीदाराचा इनपुट टॅक्स क्रेडिट अमान्य करणे-- जीएसटी पोर्टल वर जाऊन पुरवठादाराच्या विवरणपत्रकाची संपूर्ण माहीती जाणून घ्यावी. वर नमूद केलेल्या कलम १६(२) प्रमाणे तसेच कलम १६(२)(सी) प्रमाणे जर वसूल केलेला कर सरकारच्या तिजोरीत भरला असेल किंवा सेट ऑफच्या रूपाने समायोजित केला असेल तर खरेदीदाराला इनपुट टॅक्स क्रेडीट मिळालाच पाहिजे.

**३) पॅरामिटर ००७४--** पुरवठादाराचा नोंदणी दाखला रद्द केला म्हणून इनपुट टॅक्स क्रेडीट न मिळणे-- सर्वप्रथम जीएसटी पोर्टलवर जाऊन संबंधित पुरवठादारचा नोंदणी दाखला अस्तित्वात आहे की नाही ते पाहून घ्यावा. कलम ३१ प्रमाणे नोंदीत व्यापाऱ्याने करपात्र मालासाठी टॅक्स इनवोईस देणे आवश्यक आहे. असा टॅक्स इनवोईस नियमाप्रमाणे दिलेला असेल तर खरेदीदाराला कलम १६(२)(ए) प्रमाणे इनपुट टॅक्स क्रेडिट क्लेम करण्याचा अधिकार आहे.

**४) पॅरामिटर ००७३--** जीएसटीआर २ए आणि ९(८ए) पेक्षा जीएसटीआर ९ आणि ३बी मध्ये ज्यादा इनपुट एक्स क्रेडिट क्लेम केला.-- प्रथम पुरवठादाराने भरलेल्या विवरणपत्रकांचा इतिहास पाहून घ्यावा. त्यानंतर प्रत्येक पुरवठादाराच्या खरेदी बिलाप्रमाणे जीएसटीआर ३बी/९ मध्ये क्लेम केलेला इनपुट टॅक्स क्रेडिट हा जीएसटीआर २ए/९(८ए) मध्ये उपलब्ध क्रेडिटशी रिकन्साईल करून घ्यावा. सरकारच्या म्हणण्याप्रमाणे, नव्याने आलेल्या कलम १६(२)(एए) प्रमाणे पुरवठादाराने बिल अगर डेबिट नोट दिली पाहिजे आणि ती कलम ३७ प्रमाणे खरेदीदाराला कळविली पाहिजे. परंतु हे कलम अजूनही अस्तित्वात आलेले नाही. तसेच नियम ३६(४) च्या तरतुदीप्रमाणे खरेदीदाराने क्लेम केलेला इनपुट टॅक्स क्रेडिट हा जीएसटीआर २ए पेक्षा जास्त असता कामा नये. परंतु या सगळ्या तरतुदींबाबत हरकत घेणे आवश्यक आहे.

**५) पॅरामिटर ००७८---** कलम १६(४) मध्ये दिलेल्या विहित मुदतीनंतर जीएसटीआर ३बी मधून क्लेम केलेला इनपुट टॅक्स क्रेडिट मिळणे बाबत-- २०१७-१८ या वर्षाकरिता इनपुट क्रेडिट क्लेम करण्याची मुदत मार्च २०१९ चे विवरणपत्रक दाखल करण्याच्या तारखेपर्यंत वाढविलेली आहे. याबाबतीत हरकतीचा एक मुद्दा असा देऊन ठेवावा की इनपुट टॅक्स क्रेडिट क्लेम करण्यासाठी मुदत घालता येत नाही. जर भविष्यात एखाद्या कोर्टाचा निकाल व्यापाऱ्यांच्या बाजूने लागला तर त्याचा फायदा घेता येईल. परंतु त्यासाठी आपला मुद्दा भांडत राहून केस लाइव्ह ठेवली पाहिजे.

**६) पॅरामिटर ००७९--** कलम १६(४) मध्ये दिलेल्या अटी प्रमाणे पुरवठादाराने जीएसटी १ मधील विवरणपत्रक विहित मुदतीत भरले नसेल तर खरेदीदाराला इनपुट टॅक्स क्रेडिट न मिळणे बाबत-- याबाबतीत असा मुद्दा मांडावा की कलम १६ मधील सर्व अटी व शर्तींप्रमाणे खरेदीदाराला इनपुट टेक्स क्रेडिट मिळाले पाहिजे. विक्रेत्याने विहित मुदतीत जर विवरणपत्रक भरले नाही तर तो खरेदीदाराचा दोष मानता येणार नाही.

**७) पॅरामिटर ००८१--** जीएसटीआर ९(६ई)मध्ये आईसगेटच्या डाटापेक्षा आयातीवरील जादा आयजीएसटी क्लेम केल्याबाबत-- याबाबतीत सर्वप्रथम आईसगेटच्या साईटवरील डाटा तपासून घ्यावा. नियम ३६(१)(डी) प्रमाणे आयात केलेल्या मालाचा इनपुट टॅक्स क्रेडिट हा कस्टम कायदा १९६२ च्या तरतुदी प्रमाणे बिल ऑफ एन्ट्री किंवा त्या प्रकारचे कुठलेही डॉक्युमेंट यावर उपलब्ध असतो. आईसगेटवरील आयातीवरचा भरलेला आयजीएसटी हा जीएसटीआर ९(६ई) आणि जीएसटीआर ३(बी)-४(ए)(१) याच्याशी रिकनसाईल करावा. आणि त्या अनुषंगाने उत्तर तयार करून द्यावे.

**८) पॅरामिटर ००८२--** इनपुट सर्व्हिस डिस्ट्रीब्यूटरने जीएसटीआर ९(६जी) मध्ये क्लेम केलेला इनपुट टॅक्स क्रेडिट हा जीएसटीआर २ए_आयएसडीपेक्षा जास्त असल्याबाबत.-- कलम २० मध्ये आयएसडी हा क्रेडिटचे डिस्ट्रीब्यूशन कसे करतो, कलम २१ प्रमाणे ज्यादा वाटप केलेल्या क्रेडिटची वसूली कशी करायची, नियम ३८ मध्ये इनपुट टॅक्स क्रेडिटच्या वाटपाची पद्धत, नियम ५४(१) मध्ये विवरणपत्रक भरणे जीएसटीआर ६, याची माहिती दिलेली आहे. फरक का पडला आहे याचे रिकंसिलेशन करून घ्यावे. ऑडिटरने देखील या बाबीकडे लक्ष दिले पाहिजे.

**९) पॅरामिटर ००८३--** आरसीएमची लायबिलिटी जेवढी जीएसटीआर ९_४जी मध्ये दाखवली आहे त्यापेक्षा जास्त इन्पुट टॅक्स क्रेडिट जीएसटीआर ९_६सीडीएफमध्ये क्लेम करणे-- कलम ९(३) मध्ये वस्तू आणि सेवेचा पुरवठा करणार्यांची यादी नोटिफाय केलेली आहे तसेच कलम ९(४) मध्ये अनोंदीत व्यक्तींकडून होणाऱ्या पुरवठ्याची यादी नोटीफाय केली आहे. कलम ३८(२) इनवर्ड सप्लायचा तपशील पुरवण्याबाबत विवेचन केले आहे. जीएसटीआर ९_४जी मध्ये जाहीर केलेला कर हा जीएसटीआर ९_६सीडीएफ प्रमाणे क्लेम  केलेल्या इनपुट क्रेडिटपेक्षा जास्त आहे याची ऑडिटरने खात्री करून घेतली पाहिजे.

**ब) आऊटपुट टॅक्सवर आधारित छाननी पॅरामीटर्स-**

**१) पॅरामिटर ००७०--** जीएसटीआर ९ आणि ३बी पेक्षा जीएसटीआर १ मध्ये ज्यादा आऊटवर्ड टॅक्स दाखवणे-- संबंधित विवरणपत्रके तपासून त्यामध्ये चूक असल्यास शोधणे आणि योग्य पद्धतीने उत्तर देणे.

**२) पॅरामिटर ००७५--** जीएसटीआर ८ (टीसीएस) पेक्षा जीएसटीआर १ मध्ये कमी उलाढाल दाखवणे--कलम ५२ मध्ये टॅक्स एट सोर्सच्या तरतुदी दिलेल्या आहेत. तसेच नियम ६७ मध्ये ई कॉमर्स ऑपरेटरच्या मार्फत स्टेटमेंट कसे दाखल करायचे याची माहिती दिली आहे. ज्या उलाढालीवर टीसीएस गोळा केला आहे आणि जीएसटीआर ८ मध्ये भरलेला आहे, तसेच जीएसटीआर १ मध्ये संबंधित दाखवलेली उलाढाल, या सर्वांचे रिकंसिलेशन करणे

**३) पॅरामिटर ००७६--** जीएसटीआर ७ पेक्षा जीएसटी आर ३बी मध्ये कमी उलाढाल दाखवणे (टीडीएस)-- कलम ५१ मध्ये टॅक्स डिडक्टेड एट सोर्सच्या तरतुदी दिलेल्या आहेत. तसेच नियम ६६ मध्ये त्यासंबंधित विवरणपत्रक जीएसटीआर ७ मध्ये भरावयाचे असे सांगितले आहे. ज्या उलाढालीवर टीडीएस कपात करून जीएसटीआर ७ प्रमाणे भरलेला आहे त्याचे जीएसटीआर ३बी मध्ये कर भरताना दाखवलेली उलाढाल याचे रिकनसिलेशन करावे.

**क) व्याज आणि दंडाचे बाबतीतील पॅरामीटर--**

**पॅरामिटर ००७१--** जीएसटीआर ३बी पेक्षा इ वे बिल मध्ये ज्यादा आऊटवर्ड टॅक्स दाखवणे--कलम ६८ आणि नियम १३८ मध्ये मालाची तपासणी करणे आणि ई वे बिलाच्या तरतुदी दिलेल्या आहेत. ज्या आऊटवर्ड सप्लाय करता इ वे बिल काढलेले आहेत त्याचे जीएसटीआर १ मध्ये जाहीर केलेला आऊटवर्ड टॅक्स आणि जीएसटीआर३बी मध्ये जाहीर केलेल्या पुरवठा याचे रिकंसिलेशन करावे.

**ड) इतर गुन्हे आणि दंड या बाबतीतील पॅरामीटर--**

**पॅरामिटर ००७७--** जीएसटीआर १ मध्ये पुरवठादाराने दाखवलेल्या लाएबिलिटीपेक्षा जीएसटीआर ९/३बी/४ मध्ये कमी आरसीएमची लाएबिलिटी दाखवणे-- जीएसटीआर३बी-_३(१)(डी) आणि जीएसटीआर९_४जी प्रमाणे भरलेला आरसीएम याचा जमाखर्चाच्या पुस्तकांमध्ये केलेली तरतूद याचेशी रेकंसिलिएशन करावे. जीएसटीआर ९_४जी मध्ये जाहीर केलेला आरसीएम हा, पुरवठादाराने दाखल केलेला जीएसटीआर १ च्या आधारे जीएसटी २ए मध्ये दिसत असणारी आरसीएम लायबिलिटी ही समान किंवा जादा आहे याची खात्री करून घ्यावी. जीएसटीआर ९_६डी मध्ये क्लेम केलेला आरसीएम हा जीएसटीआर २ए मध्ये दिसणाऱ्या आरसीएम पेक्षा कमी आहे याची खात्री करून घ्यावी.

**इ) व्याजावर आधारित पॅरामीटर--**

**पॅरामिटर ००८०--** जीएसटीआर३बी मधून उशिरा केलेल्या कर भरण्यावर लागणारे व्याज--व्याजाच्या तरतुदी कलम ५० मध्ये नमूद केलेल्या आहेत. विवरणपत्र उशिरा आहे का हे पाहून रोखीने व्याज भरले आहे का नाही याची खात्री करून घ्यावी.

याशिवाय वर नमूद केलेल्या मुद्द्यांपैकी काही मुद्द्यांबाबत कोर्टाचे निर्णय झालेले आहेत. त्याचा देखील उल्लेख प्रत्येक पॅरामिटरचा खुलासा करताना करणे आवश्यक आहे.